# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालत त राज्य विद्यापीठ)

## (क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग)

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

---

जावक क्र./गों.वि.ग./क्री.शा.शि./ २१ /२०२३ दिनांक : ०९/०१/२०२३

प्रति, **सुधारीत**

मा. प्राचार्य / सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी
सर्व संलग्नीत महाविद्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :- अमृत क्रीडा व कला महोत्सव -२०२३, क्रीकेट स्पर्धेच्या आयोजनाबाबत..**

संदर्भ - या कार्यालयाचे पत्र क्र. ५११/२०२२, दिनांक ०९/१२/२०२२

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये **अमृत क्रीडा व कला महोत्सवा**चे गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दि. २७ ते २९ जानेवारी, २०२३ दरम्यान आयोजन करण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर महोत्सवातील क्रीकेट स्पर्धेकरीता विविध महाविद्यालयांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या संघांनी विद्यापीठाकडे नोंदणी केलेली आहे. क्रीकेट खेळासह इतरही क्रीडा प्रकारात कर्मचारी यांना सहभाग घेता यावा तसेच इतरही क्रीडांचे सुव्यवस्थीत नियोजन करता यावे यादृष्टिने क्रीकेटचे साखळी सामने दोन झोन **(झोन - नवरगाव व वरोरा)** मध्ये खेळविण्यात येत आहेत. त्यापुढील सामने (Semi Final & Final) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे क्रीडा महोत्सवामध्ये खेळविण्यात येतील, याची सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

**झोन : नवरगांव**
**स्पर्धेची दिनांक : दि. १४ व १५ जानेवारी, २०२३**
**रिपोर्टींगची वेळ : सकाळी ०८.०० वाजता**
**स्पर्धेचे स्थळ : ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव जि. चंद्रपूर**
**स्पर्धा प्रभारी : डॉ. मनोज अरमरकर, भ्रमणध्वनी क्रमांक 8262913468**

**नवरगाव झोनचे सामने पुढीलप्रमाणे -**

1) जैनुद्दिन जव्हेरी महाविद्यालय, वडसा
2) नेवजाबाई हितकारीणी महा., ब्रम्हपुरी
3) ग्रामगीता महाविद्यालय, चिमुर
4) ज्ञानेश महाविद्यालय, नवरगांव
5) गोविंदराव मुनघाटे महा. कुरखेडा
6) राष्ट्रपीता महात्मा गांधी महा. नागभीड
7) डि के. महाविद्यालय, कुरखेडा
8) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली



**झोन : वरोरा**
**स्पर्धेची दिनांक : दि. १४ व १५ जानेवारी, २०२३**
**रिपोर्टींगची वेळ : सकाळी ०८.०० वाजता**
**स्पर्धेचे स्थळ : आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर**
**स्पर्धा प्रभारी : श्री. तानाजी बायस्कर, भ्रमणध्वनी क्रमांक 9594909981**

**वरोरा झोनचे सामने पुढीलप्रमाणे -**

1) गुरूनानक महाविद्यालय, बल्लारपुर
2) चिंतामणी महाविद्यालय, पांभुर्णा
3) आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा
4) महात्मा गांधी महाविद्यालय, गडचांदूर
5) सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
6) जनता महाविद्यालय, चंद्रपूर
7) शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली




**टिप :-**

१. प्रत्येक झोन मधुन २ संघाची निवड केली जाईल.
२. प्रत्येक सामना १० षटकांचा राहील.
३. क्रिकेट सामना हेवी टेनिस बॉल ने खेळविल्या जाईल.
४. प्रत्येक संघातील नियमीत शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी स्वखर्चाने नियोजीत ठिकाणी खेळण्याकरीता वेळेत उपस्थित राहावे, अनुपस्थित राहील्यास संघ बाद ठरविण्यात येईल.
५. प्रत्येक क्रिकेट संघाने बॅट व इतर आवश्यक साहीत्य स्वत: घेऊन यावे.
६. प्रत्येक संघातील कर्मचारी यांनी खेळाच्या ठिकाणी महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे मुळ ओळखपत्र व आधार कार्ड सोबत घेऊन यावे, नियमानुसार नियमीत शिक्षकेत्तर कर्मचारी यांनाच संघात स्थान राहील, नियमांचे उल्लंखन केल्यास संघास बाद ठरविण्यात येईल.
७. स्पर्धा प्रभारी यांनी विद्यापीठाकडे नोंदणी केलेल्याच कर्मचाऱ्यांची ओळख पटवून त्यांना संघात स्थान द्यावे.
८. पंचाचा निर्णय अंतिम राहील.
९. प्रत्येक कर्मचारी यांनी खेळतांना खेळ भावनेतुन खेळावे.
१०. नशा/धुम्रपान करण्यास सक्त मनाई असेल, तसेच प्रशासकीय कार्यवाहीस प्राप्त असेल.
११. खेळतांना इजा होणार नाही याची दक्षता घ्यावी, इजा झाल्यास स्वत: जबाबदार राहील.
१२. विद्यापीठामार्फत नियुक्त परिक्षकांच्या देखरेखी खाली सामने खेळविले जातील व त्याचा अहवाल वेळोवेळी क्रिडा व शारिरीक शिक्षण विभाग, गों.वि. गडचिरोली यांचे कडे सादर करण्यात येईल.

डॉ. अनिता लोखंडे
संचालक, क्रीडा व शा. शिक्षण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव -
1) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
2) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
3) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली